महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**महत्वाचे/प्राधान्य-शासन निर्णय**

क्र.पोमसं/३९/४२/सा.अ.(DCPS)४८/२०२३.

दिनांक : ११ /०४/२०२३

**विषय : परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत..**

*********

शासन पत्र/निर्णय क्रमांक : रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक-३१/०३/२०२३ ची प्रत सहपत्रांसह पुढील कार्यवाहीकरिता पाठविली आहे.

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि.२९/०९/२०१८ अन्वये लागू करण्यात आलेली सानुग्रह अनुदान योजना उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून बंद करण्यात येत आहे. सानुग्रह अनुदानासाठी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेण्यात येऊ नये तसेच प्रलंबित प्रकरणे बंद करण्यात यावी. अशा सूचना सदर शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. तरी सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन अंशदायी परिभाषित योजना सानुग्रह अनुदान मंजुरीबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता या कार्यालयास पाठवू नयेत. तसेच यापूर्वीची प्रकरणेही बंद करण्यात आली असल्याने शासन व या कार्यालयाकडे प्राप्त झालेले प्रस्ताव (मुळ कागदपत्रे) परत करण्याची तजवीज ठेवली आहे. त्याप्रमाणे कृपया पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**(कल्पना लोखंडे)**

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (नि.वे.)

पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

Scanned by CamScanner

पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).

अपर पोलीस महासंचालक, (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/नियोजन व समन्वय/विशेष कृती/रा.रा.पो.बल/ वाहतूक/फोर्स वन/दहशतवाद विरोधी पथक/आर्थीक गुन्हे /नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहीती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस उप महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह)

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./प्रशासन / नि. व स. / धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १ ते ४४.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. महाराष्ट्र राज्य मुंबई

२. सदरहु परिपत्रक www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर पुढील १ वर्षासाठी ठेवण्यात यावे.

Scanned by CamScanner

परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक : रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक : ३१ मार्च, २०२३.

**वाचा :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो १००७/१८/सेवा-४, दि.०७.०७.२००७.

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो २०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२७.०८.२०१४.

४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो २०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५.

५) केंद्र शासनाचे कार्यालयीन ज्ञापन क्र.३८/४१/०६/P&PW(A), दि.०५.०५.२००९

६) केंद्र शासनाचे कार्यालयीन ज्ञापन क्र.७/५/२०१२-P&PW(F)/B, दि.२६.०८.२०१६.

७) केंद्र शासनाची अधिसूचना क्र.G.S.R.२२७ (E) , दिनांक ३०.०३.२०२१.

८) केंद्र शासनाची अधिसूचना क्र.G.S.R.६५८ (E) , दिनांक २३.०९.२०२१.

**प्रस्तावना :-**

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००५ व दिनांक २७.०८.२०१४ अन्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनुक्रमे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना व राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू करण्यात आली आहे. परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना /राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत.

२. तद्नंतर केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.७ येथील Central Civil Services (Implementation of National Pension System) Rules, २०२१ दिनांक ३०.०३.२०२१ अन्वये केंद्र शासनाच्या सेवेतील राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवेत कार्यरत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तिवेतन अथवा रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय केले आहे.

तसेच केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.८ येथील Central Civil Services (Payment of Gratuity under National Pension System) Rules, २०२१ दिनांक २३.०९.२०२१ अन्वये केंद्र शासनाच्या सेवेतील राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवेत कार्यरत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या

Scanned by CamScanner

कुटुंबाला मृत्यू उपदान, रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान अनुज्ञेय केले आहे.

३. केंद्र शासनाच्या वरील निर्णयाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेतील परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्याचा

(अ) सेवेत असतांना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान,

(ब) रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवा उपदान लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर कुटुंब निवृत्तिवेतनधारकास व रुग्णता निवृत्तिवेतनधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन / रुग्णता निवृत्तिवेतन लागू होईल.

(क) तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान लागू करण्यात येत आहे.

वरील निर्णयानुसार प्रदान करण्यात येणाऱ्या सेवा उपदान व मृत्यु उपदानाच्या प्रयोजनार्थ सद्य:स्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील तरतूदी लागू राहतील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि.२९.०९.२०१८ अन्वये लागू करण्यात आलेली सानुग्रह अनुदान योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून बंद करण्यात येत आहे. सानुग्रह अनुदानासाठी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेण्यात येऊ नये तसेच प्रलंबित प्रकरणे बंद करण्यात यावी.

३. दिनांक ०१.११.२००५ ते या निर्णयाच्या दिनांकापर्यंत मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास मृत्यू उपदान, कुटुंब निवृत्तिवेतनाची थकबाकी तसेच नियमित कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यासाठी सदर शासन निर्णयासोबतचा नमुना-३ मधील विकल्प कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा लागेल. त्यानुसार कुटुंब निवृत्तिवेतनधारकास त्याला मिळालेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम व परिभाषित निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाच्या अंशदानाची व्याज / लाभांशासह रक्कम समायोजित



Scanned by CamScanner

करण्याच्या अटीवर कुटुंब निवृत्तिवेतनाचा लाभ अनुज्ञेय होईल. सदर रक्कम समायोजित झाल्यानंतर कुटुंब निवृत्तिवेतनधारकास नियमितपणे कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील.

४. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या व यापुढे शासकीय सेवेत नियुक्त होणारा कर्मचारी यांनी त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा रुग्णता सेवानिवृत्त झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्याबाबत **अथवा** राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत त्याची कायम निवृत्तिवेतन लेखा क्रमांक (PRAN) मध्ये जमा असलेली संचित रक्कम निवृत्तिवेतन निधी विनियमक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अनुक्रमे कुटुंबास किंवा त्याला मिळण्याबाबतचा सोबतचा नमुना-२ मध्ये विकल्प कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा.

५. जे शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा विकल्प सादर करतील, त्यांनी नमुना-१ प्रमाणे कुटुंबाचा तपशील सादर करणे अनिवार्य आहे.

६. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वरील परिच्छेद क्र.४ प्रमाणे विकल्प देणे बंधनकारक राहील. तसेच यापुढे शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यानी उपरोक्तप्रमाणे विकल्प शासन सेवेत नियुक्त झाल्यावर ८ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

७. शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापिठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषी विद्यापिठे व तत्सम अनुदानित संस्थामधील कर्मचाऱ्यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफरांसह लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही त्यांच्या स्तरावरुन करावी.

८. या अनुषंगाने कार्यपध्दतीबाबतच्या सविस्तर सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०४०३१३३३३३०७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAMAKANT
SHIVAJIRAO
GHATGE

Digitally signed by RAMAKANT SHIVAJIRAO GHATGE [illegible]

**(र.शि.घाटगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. भारत सरकारचे संचालक, वित्त विभाग, आर्थिक कार्य विभाग, (ECB & PR Division), नवी दिल्ली,



Scanned by CamScanner

२. मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन विकास भवन, नवी दिल्ली,
३. नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली
४. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
६. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
८. मा.राज्यपालांचे सचिव,
९. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
१०. मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
११. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य,
१८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१९. प्रबंधक, अपील शाखा,उच्च न्यायालय, मुंबई,
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
२२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२३. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२४. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,मुंबई,
२५. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
२७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२८. सर्व विभागीय आयुक्त,
२९. सर्व जिल्हाधिकारी,
३०. सर्व जिल्हयातील निवडमंडळे
३१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
३३. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
३४. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
३५. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.



Scanned by CamScanner

३६. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती/नागपूर,

३७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी,

३८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

३९. सर्व उपकोषागार अधिकारी,

४०. कार्यकारी संचालक,निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण, बी-१४/ए, छत्रपती शिवाजी भवन, कुतुब संस्थागत क्षेत्र, कटवारिया सराय, नवी दिल्ली- ११००१६

४१. कार्यकारी उपाध्यक्ष, मे.एन.एस.डी.एल. e-Governance Infrastructure Limited, १ ला मजला, टाईम्स टॉवर, कमला मिल कम्पाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३

४२. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,

४३. सर्व जिल्हयांचे मुख्य लेखा अधिकारी,

४४. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,

४५. तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

४६. संचालक, महानगरपालिका प्रशासन, मंबई,

४७. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,

४८. सर्व विभागीय तंत्र शिक्षण व संचालक,

४९. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,

५०. सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ,

५१. सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य,

५२. सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण),

५३. कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर,

५४. कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,.

५५. कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला,

५६. कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी,

५७. वित्त विभागातील सर्व कार्यासने.

५८. निवड नस्ती.



Scanned by CamScanner

## नमुना १
## कुटुंबाचा तपशील

शासकीय कर्मचाऱ्याचे नाव ..
पदनाम ..
जन्म तारीख ..
नियुक्तीचा दिनांक ..

······ रोजी माझ्या कुटुंबात* असलेल्या सदस्यांचा तपशील

| अनुक्रमांक (१) | कुटुंबातील सदस्याचे नाव* (२) | जन्मतारीख (३) | शासकीय कर्मचाऱ्याशी असलेले नाते (४) | कार्यालय प्रमुखाची सही (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |

वरील तपशिलात कोणतीही भर पडल्यास किंवा फेरबदल झाल्यास त्यासंबधीची माहिती कार्यालय प्रमुखास/लेखापरीक्षा अधिकाऱ्यास कळवून हा तपशील अद्यावत ठेवण्याची मी याद्वारे हमी घेतो.

ठिकाण :
दिनांक :

शासकीय कर्मचाऱ्याची सही

*या प्रयोजनासाठी "कुटुंब" याचा अर्थ, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ यातील नियम ११६ (१६) (बी) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले "कुटुंब" असा होतो.

टीप.--पत्नी व पती यामध्ये अनुक्रमे **न्यायिक** फारकत घेतलेल्या पत्नीचा व पतीचा समावेश होतो.



Scanned by CamScanner

## नमुना - २

## सेवेत असताना शासकीय कर्मचारी विकलांगतेमुळे शासकीय सेवेकरिता असमर्थ ठरल्यास / मृत्यू पावल्यास त्याला अनुज्ञेय लाभ मिळण्याबाबतचा विकल्प

मी, .................................................. याद्वारे विकल्प देत आहे की, शासन सेवेत असताना विकलांगतेमुळे शासकीय सेवेकरिता असमर्थ ठरल्यास / मृत्यू पावल्यास मला / माझ्या कुटुंबास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम,१९८२ अनुसार लाभ देण्यात यावेत.

अथवा

मी, .................................................. याद्वारे विकल्प देत आहे की, शासन सेवेत असताना विकलांगतेमुळे शासकीय सेवेकरिता असमर्थ ठरल्यास / मृत्यू पावल्यास मला / माझ्या कुटुंबास राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अनुसार लाभ देण्यात यावेत.

शासकीय कर्मचाऱ्याची स्वाक्षरी
नाव
पदनाम
कार्यालयाचे नाव व पत्ता

ठिकाण :

दिनांक :

हा विकल्प दिल्यामुळे यापूर्वी दिलेला विकल्प रद्द समजण्यात यावा.
* आवश्यक नसेल ते खोडावे.

---

**कार्यालय प्रमुख यांनी भरावे.**

विकल्प प्राप्त झाल्याचा दिनांक .....................

याबाबतचा नोंद सेवापुस्तकामधील पृ.क्र.    /प.वि. वर घेण्यात आली आहे.

कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

विकल्प स्विकारल्याची प्रत संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात यावी.



Scanned by CamScanner

## नमुना-३

### परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना दि.१.११.२००५ ते आजपर्यंतच्या कालावधीत रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी / मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी द्यावयाचा विकल्प

मी, ................................................... याद्वारे विकल्प देत आहे की, मला राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालींतर्गत लाभ देण्यात यावे.

अथवा

मी, ................................................... याद्वारे विकल्प देत आहे की, मला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ अंतर्गत लाभ देण्यात यावे. सदर लाभ अनुज्ञेय करताना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत देण्यात आलेले लाभ समायोजित करण्यात यावे.

रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याची स्वाक्षरी /
कुटुंब निवृत्तिवेतनधारकाची स्वाक्षरी



Scanned by CamScanner